2019-20

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625


E-ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## International Multidisciplinary E-Research Journal

Peer Reviewed-Referred & Indexed Journal
February 2020 Special Issue -245




Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
M.S.G. Arts, Science & Commerce
College, Malegaon Camp,
Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

RESEARCH JOURNEY

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

**Impact Factor – 6.625** **E-ISSN – 2348-7143**

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

## International Multidisciplinary E-Research Journal

**Peer Reviewed-Referred & Indexed Journal**

**February 2020 Special Issue –245**

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**M.S.G. Arts, Science & Commerce College, Malegaon Camp,**
**Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)**
**Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)**
**Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)**
**Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)**

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**
For Details Visit To : www.researchjourney.net

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

**Cover Photo (From Internet) :** Marathi Rajbhasha Din (Maharashtra State-Regional Language)

© **All rights reserved with the authors & publisher**

**Price : Rs. 1000/-**

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | E-ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019) | Special Issue 245 | February 2020
Peer Reviewed-Referred & Indexed Journal

## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
Prof. Tejesh Beldar, **Nashikroad (English)**
Dr. Gajanan Wankhede, **Kinwat (Hindi)**
Mrs. Bharati Sonawane-Nile, **Bhusawal (Marathi)**
Dr. Rajay Pawar, **Goa (Konkani)**

**Co-Editors -**

- **Prof. Mohan S.** - Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva** - Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju** – Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head. Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.] India**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**

**Advisory Board -**

- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**

- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali ,** HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

PRINCIPAL
College, HINGOLI

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) - 6.625 (2019)
Special Issue 245
Peer Reviewed-Referred & Indexed Journal
E-ISSN : 2348-7143
February 2020

# INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | **English Section** | | |
| 1 | Analytical Study of Students Indiscipline in North Maharashtra | Dr. Shailaja Bhangale | 06 |
| 2 | Evaluation: A Key Factor in Education | Dr. T. K. Kanthale | 10 |
| 3 | Impact of Parental Pattern on Self-Concept of Teenagers | Dr. Ganesh Lokhande | 13 |
| 4 | Cropping Intensity Index of Solapur District with Reference to Agricultural Land Area | Dr. Rajesh Gavkare | 18 |
| 5 | Political Issues in the Novels of Rohinton Mistry | Hemantkumare Patil | 23 |
| 6 | Jammu & Kashmir Special Status: Article 370 and Article 35A | Dr. Chandrakant Gondhali | 26 |
| 7 | Kuchh Kuchh Hota Hai: A Psychoanalytical Study | Dr. Smita Chaudhari | 29 |
| 8 | Pomegranate Variety and Cost, Yield, Profit Analysis of Dhule District (M. S.) India | Dr. Suresh Ahire | 33 |
| 9 | Women Entrepreneurship Management and Development in India To Suceed in Globalization | Dr. Shivaji Thore | 40 |
| 10 | Bhasmikarana in Sun Heat (Suryaputa) Followed By) E-DAX Analysis | Dr. Rupali Gulalkari | 44 |
| 11 | Geo Economic Development of Dhule District (M.S.) A Case Study of Pomegranate Cultivation | Dr. N. B. Bachhav | 48 |
| 12 | Semiotic Appreciation of 'O Captain! My Captain!' | Mr. C. E. Gurule | 53 |
| 13 | Shashi Deshpande: Reading Feminism in Roots And Shadows | Dr. Shailesh Bahadure | 56 |
| 14 | Socio-Economic Status of Physically Challenged | Dr. Shailaja Bhangale | 64 |
| 15 | Financial, Managerial, Quality and Accreditational issues of Education in India to Succeed in Globalization | Dr. Shivaji Thore | 67 |
| 16 | Rural Development | Dr. Sambhaji Tanpure | 75 |
| 17 | A Spotlight on Nandi As A Speech Situation in Tendulkar's Ghashiram Kotwal | Dr. Umesh Jagadale | 79 |
| 18 | Upliftment of Nation Through Social Entrepreneurship | Dr. Ganesh Patare | 86 |
| 19 | Impact of Social Media in Creation of Psycho Social Problem | Prof. Bhaskar Hole | 93 |
| 20 | A Review of Communication Skills And Life Skills | Dr Umesh Jagadale | 96 |
| 21 | Haematological Parameters of Capra Hircus in Infected and Normal Host By Cestode Parasites | Ziyaurrahman Z. H. & Sunil Patil | 101 |
| 22 | Role of ICT in Teaching - Learning of Language | Prof. Sharad Awari & Prof. Sunil Mhankale | 104 |
| 23 | HRM in 21st century : Analysis | Prof. Anjum Shaikh & Dr. Yogita Bhilore | 107 |
| 24 | Comparative Study of the School Adjustment of Adolescent | Dr. Pingala Dhande | 112 |
| 25 | Occupational Stress and Its Management among Urban and Rural Area School Teacher | Dr. Manoj Nikalje | 116 |
| 26 | Social Views of M. K. Gandhi Behind Khadi | Dr. Anuradha Khade | 122 |
| 27 | Assessment of Soil Suitability for Fruit Crops in Nashik District | Dr. N. B. Bachhav | 125 |
| | **हिंदी विभाग** | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 28 | मैत्रेयी पुष्पा की कहानियों में चित्रित नारी पात्र : गोमा हंसती है के सन्दर्भ में | प्रा. धोंडिबा भुरे | 128 |
| 29 | वाल्मिकि रामायण और राम के स्वरूप की स्थापना | सुमन रानी, प्रो. मन्जुनाथ अंबिग | 135 |
| 30 | 'पद्मावत' की भाषा विधान | डॉ. वसुंधरा उपाध्याय | 146 |
| 31 | गांधीजी और स्वावलंबन | डॉ. मधुलता व्यास | 151 |
| 32 | 'आज बाजार बंद है' उपन्यास का मूल्यांकन | डॉ. बळीराम भुक्तरे | 155 |
| 33 | अब्दुल बिस्मिल्लाह का उपन्यास साहित्य (समर शेष है और मुखड़ा क्या देखे के संदर्भ में) | डॉ. अशोक तायडे | 159 |
| 34 | विश्वंभरनाथ शर्मा 'कौशिक' का हिंदी उपन्यासों में योगदान | डॉ. अरुण घोगरे | 162 |
| 35 | वेद पाल कृत 'सखी री मोहे मिल गये मेरे राम' | डॉ. सुनिता शर्मा | 164 |
| 36 | प्रभा खेतान के 'छिन्नमस्ता' उपन्यास मे नारी मुक्ति का स्वर | डॉ. संजय गडपायले | 170 |
| 37 | महादेवी वर्मा का साहित्यिक दृष्टिकोण | विप्रा राऊल | 174 |
| 38 | जयशंकर प्रसाद के उपन्यासों मे मानवतावाद | डॉ. अरुण घोगरे | 178 |
| 39 | खेमो मे बटता साहित्य और प्रसार मध्यम | डॉ. दशरथ वाघ | 180 |
| 40 | नागार्जुन के उपन्यासों मे शिक्षित स्त्री | डॉ. समीर सय्यद | 183 |


## मराठी विभाग


| | | | |
|---|---|---|---|
| 41 | आदिवासी समाजातील भगताचे स्थान | डॉ. अंजली मस्करेन्हस | 186 |
| 42 | आदिवासी संस्कृती : स्वरूप, विकास आणि समस्या | डॉ. भास्कर शेळके | 191 |
| 43 | संत कर्ममेळा यांच्या अभंग काव्याचे सामाजिक, वाङ्मयीन मूल्यमापन | डॉ. संदीप सांगळे | 194 |
| 44 | राजकीय परिवर्तनाचा विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. संभाजी पाटील | 203 |
| 45 | नवीन राज्यनिर्मिती – प्रश्न प्रादेशिक असमतोलाचा, सर्वांगीण विकासाचा | डॉ. संजय पाटील | 209 |
| 46 | भारतीय साहित्यातील महात्मा गांधींचे विचारदर्शन | डॉ. अनिल भगत | 215 |
| 47 | विविध राजकीय पक्षांची निवडणूक विषयक कामगिरी | डॉ. अजय बोरकर | 222 |
| 48 | ग्रामीण नाटक | डॉ. रमाकांत कराड | 227 |
| 49 | लोकसंख्या आणि पर्यावरण संबंध | डॉ. नवनाथ शिंदे | 231 |
| 50 | मराठी काव्यातील सांस्कृतिक पर्यावरण | डॉ. ज्योती माने | 236 |
| 51 | जागतिकीकरण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. रामदास मुक्टे | 240 |
| 52 | अहिराणी भाषेतील बहिणाबाई शकुंतला पाटील- रोटवदकर यांच्या कवितेचा चिकित्सक अभ्यास | डॉ. सचिन पाटील | 244 |
| 53 | अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील वास्तव | डॉ. अनिता सोनवणे | 250 |
| 54 | आदिमांच्या धर्म संकल्पना आणि देव-देवता | डॉ. अनिल गर्जे | 253 |
| 55 | पेशवेकालीन स्त्री गुलामगिरी | डॉ. लता आंदे | 257 |
| 56 | भंडारा जिल्ह्यातील कोसा वस्त्रोद्योगाचे चिकित्सक अध्ययन | डॉ. सौ. अनिता दाणी | 263 |
| 57 | लाल लजपतराय यांची स्त्री विषयक भूमिका | डॉ. राजेंद्र रासकर | 266 |
| 58 | वादळातील दीपस्तंभ : संत वाङ्मय | डॉ. सौ. अलका इंदापवार | 271 |
| 59 | सण-उत्सव व कृषिजीवन | श्री एस. आर. साळुंखे | 276 |
| 60 | 'मुखवटा'मधील स्त्री चित्रण | डॉ. रेखा वडीखाये | 287 |
| 61 | नागरिकता संशोधन विधेयक, २०१९ | डॉ. प्रकाश पाटील | 292 |
| 62 | नंदुरबारच्या पाणीप्रश्नाची सोडवणूक | डॉ. उज्वला भिरुड (नेहेते) | 294 |
| 63 | उच्च शिक्षणातील मूल्यांकन व मान्यता परिषदेचे योगदान | श्री विपिन वैराट | 297 |


PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

| | | | |
|---|---|---|---|
| 64 | वाचन प्रेरणा दिन : दशाआणि दिशा | प्रा. तुळजाराम खैरे | 302 |
| 65 | राजकीय संस्कृती : एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. संभाजी पाटील | 305 |
| 66 | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक विश्लेषण २०१९ विदर्भाचे विशेष संदर्भात | डॉ. प्रमोद शंभरकर | 311 |
| 67 | संकारांचे तत्त्वज्ञान : 'श्यामची आई' | डॉ. प्रवीण कारंजकर | 314 |
| 68 | सिनेमाची भाषा, शैली, संस्कृती | डॉ. सुहास पाठक | 318 |
| 69 | स्वातंत्र्यपूर्व खानदेशी वृत्तपत्रांमधील 'संघटन' विषयक विचार | डॉ. उज्वला भिरुड (नेहेते) | 321 |
| 70 | मराठी कवितेतील नवीनतेचा प्रवाह | डॉ. महादेव कांबळे | 327 |
| 71 | 'बेबास' कथासंग्रहातील सामाजिक जाणीव | प्रा. वंदना नेमाडे | 331 |
| 72 | २१ व्या शतकात महात्मा गांधींच्या विचारांची प्रासंगिकता | डॉ. जी. डी. घोडे | 335 |
| 73 | शिरपूर शहरातील अध्यापक महाविद्यालयातील छात्र अध्यापकांचे व्यक्तीमत्त्व व नेतृत्त्वगुण यांच्या सहसंबधांचा अभ्यास | डॉ. गजानन खेकाडे | 343 |
| 74 | म. ज्योतिबा फुले यांचे पद्यरूपातील चरित्र 'ज्योतिगाथा' | डॉ. दीपक गायकवाड | 348 |
| 75 | कुसुमाग्रजांच्या कवितेतील सामाजिकता | डॉ. अंजली पांडे | 352 |
| 76 | आत्मनियंत्रणासाठी योग | प्रा. दर्शना सायाम | 356 |
| 77 | ढब्बाशास्त्री परान्ने – पहिली विनोदी कादंबरी | डॉ. संजय दरवडे | 360 |
| 78 | शालेय पोषण आहार योजनेचा विद्यार्थ्यांच्या संपादणूकीवरील परिणामांचा अभ्यास करणे | श्री. प्रमोद सोनार, एच. वाय. देवरे | 364 |
| 79 | महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित ! | डॉ. अशोक लिंबेकर | 371 |
| 80 | महानुभावीय चरित्र ग्रंथ | डॉ. भास्कर शेळके | 374 |
| 81 | आधुनिकतेचा विचार | डॉ. महादेव कांबळे | 378 |
| 82 | पर्यटनसाठी 'राष्ट्रीय'आणि 'आंतरराष्ट्रीय' ग्रंथालय | कु. सपनाराणी रामटेके | 382 |
| 83 | भारतीय कृषिधोरण व शेतकऱ्यांच्या समस्या | डॉ. सुनंदा देशपांडे | 386 |
| 84 | मुकुंदराव पाटील यांच्या कथेतील ग्रामीण शोषणाचे चित्रण | डॉ. संजय दरवडे | 392 |
| 85 | दामोदर मावजांल्या कथांतील क्रिस्तांव स्त्री पात्रां | दीपराज सातोर्डेकार | 396 |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी राखून ठेवलेले आहेत. प्रकाशकांच्या पूर्वपरवानगीशिवाय या अंकातील लेखांचे पुनर्प्रकाशन करता येणार नाही. या अंकात व्यक्त झालेली मते व विचार हे त्या लेखाच्या लेखकांचे वैयक्तिक विचार आहेत त्याच्याशी संपादक किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ मालकी हक्कासंदार्भातील संपूर्ण जबाबदारी लेखाच्या लेखकांची असेल.* **- मुख्य संपादक, रिसर्च जर्नी**

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625 (2019)
Special Issue 245
Peer Reviewed-Referred & Indexed Journal
E-ISSN : 2348-7143
February 2020

# जागतिकीकरण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या : एक विश्लेषणात्मक अभ्यास

प्रा. डॉ. रामदास डी. मुक्टे
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली

## प्रस्तावना

भारतामध्ये आर्थिक विकासाला सन १९५०–५१ पासून खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. नियोजीत विकास साध्य करण्यासाठी नियोजनाच्या माध्यमाने पंचवार्षिक योजना राबविण्यात आल्या. परंतू भारतीय अर्थव्यवस्थेत येणारे अनेक आर्थिक संकटे यामुळे विकासाचा अपेक्षित दर गाठणे शक्य झाले नाही. १९८० च्या दशकात अर्थव्यवस्थेची आर्थिक स्थिती अतिशय बिकट झाली होती. यातुन मार्ग काढण्याासाठी भारताचे पंतप्रधान पी.व्ही नरसिंहराव आणि अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांनी जुलै १९९१ मध्ये नविन आर्थिक धोरण जाहीर केले आणि या आर्थिक धोरणामध्ये जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणाचा स्विकार केला.[१]

१९९१ च्या नविन आर्थिक धोरणाचा परिणाम अर्थव्यवस्थेतील प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय अशा सर्वच क्षेत्रावर कमी अधिक प्रमाणात झाल्याचा दिसून येतो. भारतीय कृषिक्षेत्र हे महत्वाचे क्षेत्र असुन ग्रामीण भागात राहणाऱ्या ९५ टक्के जनतेच्या उपजिविकेचे प्रमुख साधन कृषि आहे. अशा महत्वपूर्ण क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या शेतकऱ्यांच्या एकुण आर्थिक स्थितीवर काय परिणाम झाला व त्याच्या जिवनमानामध्ये काय बदल झाले हे अभ्यासण्याची आवश्यकता लक्षात घेऊन प्रस्तूत संशोधन करण्यात आले आहे.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये

१)जागतिकीकरणाची संकल्पना स्पष्ट करणे.

२) जागतिकीकरणामुळे भारतीय कृषि क्षेत्रात झालेल्या बदलाचा आढावा घेणे.

३) जागतिकीकरण आणि भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या या सबंधाचा अभ्यास करणे.

## संशोधन पध्दती

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी संशोधनाच्या दुय्यम संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात आला आहे. त्यामध्ये अभ्यास विषया संदर्भातील करण्यात संदर्भग्रंथ अहवाल, लेख, वृत्तपत्र आणि नेट या साधनांचा उपयोग करुन आवश्यक साहित्याचा वापर करण्यात आला आहे.

## जागतिकीकरण

भारताने १९९१ च्या शतकात नविन आर्थिक सुधारणेला सुरुवात केली. त्यापैकी एक जागतिकीरकणाचा स्विकार होय. जागतिकीकरण म्हणजे खूल्ली स्पर्धा आणि नवे तंत्रज्ञान यातून उत्पादकता आणि उत्पादन वाढविणे व संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण करणे होय.[२]

जगतिकीकरणामुळे संपूर्ण जगाची एकच बाजारपेठ निर्माण होऊन अर्थव्यवस्थेत वस्तू व सेवा विक्रीवरील सर्व प्रकारचे बंधने मुक्त असतात.

## जागतिकीकरण आणि भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्या

भारताने स्विकारलेल्या नविन अर्थिक धोरणाचा त्यामध्ये विशेषत: जागतिकीकरणाचा भारतीय अर्थव्यवस्थेतील उद्योग, सेवा, कृषि, व्यापार, बाजारपेठ याच बरोबर एकूण सामाजिक, आर्थिक परिमाण समाजरचनेवर होत असल्याचे दिसून येत आहेत.

भारत जागतिक स्तरावर कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो. कृषिक्षेत्राचा प्रभाव अर्थव्यवस्थेत मोठा आहे. यामुळे जागतिकीकरणाचा परिणाम भारतीय कृषिक्षेत्र आणि या क्षेत्रात कार्यरत असलेल्या शेतकऱ्यावर होत असल्याचा दिसून येतो.

जगतिकीकरणाचा स्विकार केल्यानंतर म्हणजेच १९९१ नंतर कृषिक्षेत्रात संरचनात्मक बदल मोठ्या प्रमाणात होत असतांना दिसून येत आहेत. कृषिक्षेत्र मोठ्या प्रमाणात आधुनिकीकरण होत आहे. त्यामध्ये कृषि अवजारे असतील किंवा आधुनिक बी¯बियाणे, खते, किटकनाशके यासारख्या साधनांचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. त्यातून कृषिक्षेत्रातील उत्पादन खर्च वाढला आहे. तर दुसऱ्या बाजूने उत्पादनातही मोठ्या प्रमाणात वाढझाली. परंतू महत्वाची बाब म्हणजे उत्पादनाच्या किंमतीत मात्र खर्चाच्या तुलनेत वाढझाली नाही. त्यामुळे उत्पादन खर्च जास्त आणि मिळणारे उत्पन्न कमी अशी अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे. शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

भारतीय कृषिक्षेत्र हे बहुअंशी कोरडवाहू असून त्याचे स्वरुप हंगामी आहे. निर्सगावर अवलंबून आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पन्नाचे हमी नसते. शेतीतून येणाऱ्या मालाला मिळणारी अधारभूत किंमत ही वास्तवाला धरुन नसते. शेतकऱ्याला मिळणाऱ्या उत्पन्नातून आपला उत्पादन खर्च वजा करुन इतरही अनेक जबाबदाऱ्या पूर्ण कराव्या लागतात. उदा. मुला–मुलींचे शिक्षण, लग्न, कुटुंबाचे आरोग्य व दैनंदिन खर्च ह्या गरजा पूर्ण करणे शक्य नसल्याने शेतकरी बॅंकाकडे, सावकाराकडे कर्ज मागणीस जातो. त्यातून तो कर्जबाजारी होत असल्याचा दिसून येतो. भविष्यकालीन मिळणाऱ्या उत्पन्नातून कर्ज परत करणे अशक्य होत असल्याने शेतकरी आत्महत्या सारख्या मार्गाकडे वळत आहे. १९९१ ला नविन आर्थिक धोरणाचा स्विकार केल्यानंतर पाच वर्षांनी म्हणजेच १९९५ पासून शेतकरी आत्महत्येस मोठ्या प्रमाणात सुरुवात झाल्याचे दिसून येते.

जगतिकीकरणापासून कृषिक्षेत्रात बहूराष्ट्रीय कंपन्यानी प्रवेश केल्याचा बघावयास मिळतो. मॉन्सेटो, सेन्झेन्टा यांसारख्या कंपन्यांनी शेतकऱ्यांच्या आत्मनिर्भरता संपवून बी–बियाणाच्या क्षेत्रात आपली मक्तेदारी निर्माण केली. भारताने ष्सामुहीक प्रयत्नातून बासमती तांदूळ, हळद, कडूलिंबूयांसारख्या विविध धान्य वनस्पती हजारो वर्षापासून विकसित केल्या. परंतू अमेरिका, जपान यांसारख्या देशातील कंपनीने कृषि विषयी पेटंटस मिळविली आहेतत्र अशा वेळी या कंपनीचे उत्पादने मिळविण्यासाठी भारतीय शेतकऱ्यांना बहूराष्ट्रीय कंपन्यांना रॉयल्टी भरावी लागते. पूर्वी कडूलिंबाच्या बिया फुकट मिळत असत. आता डब्ल्यू. आर. ग्रेस व जी.पी. मॅगी सारख्या कंपन्या ह्या भरमसाठ किंमतीना विकत आहेत. पेटंटच्या नावाखाली भारतीय शेतकऱ्याला स्वत: विकसित केलेली बी–बियाणे सुध्दा वापरता येणे कठिण झाले आहे.[३]

एका बाजूने बी–बियाणे, खते, किटकनाशके यांच्या पुरवठ्यावर बहूराष्ट्रीय कंपन्यांकडून नियंत्रण ठेवले जात आहे. दुसऱ्या बाजूने जागतिक शेती उत्पादन बाजारावर पूर्ण नियंत्रण ही बहूराष्ट्रीय कंपन्याचे तयार होत आहे. अशा स्थितीत भारतासारख्या विकसनशील देशात ८० टक्के सिमांत शेतकरी, निरक्षर शेतकरी वर्गाचे अस्तित्व धोक्यात येणार असल्याची भिती निर्माण झाली आहे.

जागतिकीकरणाचा स्विकार केल्यानंतर ष्डंकेल प्रस्तावाच्या मसुद्यानुसार विकसित देशांनी २० टक्के तर विकसनशिल देशांनी १३.३ टक्के शेतकऱ्यांना मिळणाऱ्या अनुदानात कपात करावी लागणार आहे.[४] भारतासारख्या गरीब देशात शेतीसाठी पूर्वीच अल्प अनुदान आणि त्यामध्ये घट होणार यामुळे भारतीय शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बिघडण्याची स्थिती निर्माण झाली आहे.

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI

जागतिकीकरणानंतर जागतिक व्यापाराच्या २ टक्के आयात करणे बंधनकारक झाले. याचा परिणाम भारतात कृषि उत्पादनाच्या आयातीत ४०० टक्केनी वाढझाली. अशा स्थितीत भारतीय शेतकरी उत्पादन करीत असलेल्या कृषि वस्तू विदेशी वस्तूशी स्पर्धा करु शकत नसल्यामुळे भारतीय शेतकरी आर्थिक संकटात सापडली असल्याचा दिसून येतो.

थोडक्यात जागतिकीकरणाचा भारतीय शेती व शेतकरी यांना मिळणाऱ्या लाभापेक्षा आर्थिक तोटे मोठ्या प्रमाणात होत असल्याचे दिसून येतात. यातूनच भारतीय शेतकरी जागतिकीकरणाच्या नंतर आत्महत्याकडे वळल्याचा दिसून येतो. ष्सन १९९५ ते २०११ या कालावधीत भारतात १४९७८३ शेतकऱ्यांनी २०१४ मध्ये १२३६०, २०१५ मध्ये १२६०२, २०१६ मध्ये ११३७० शेतकऱ्यांनी आत्महत्या करुन आपली जिवन यात्रा संपवली आहे. या आत्महत्या करण्याची कारणे कर्जबाजारी, वाढता उत्पादन खर्च आणि मिळणारी किंमत कमी, शेती मालाला हमी भाव न मिळणे, निर्यातीत घट व मागणी अभावी मालाचे नुकसान होणे, अशा प्रकारची कारणे निदर्शनास आली आहेत.[6]

## निष्कर्ष

१)जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चामध्ये वाढझाली. परंतू उत्पादित मालाच्या किंमतीत वाढझाली नाही. परिणामी शेतकऱ्यांनी आत्महत्येचे पाऊल उचलले दिसते.

२) शेतकऱ्यांना शेती व्यवसाया संदर्भात मिळणाऱ्या अनुदानामध्ये घट झाली. त्यामुळे कृषि मालाच्या निर्यातीवर विपरीत परिणाम होत आहे.

३) जागतिकी बाजारपेठेतील स्पर्धेला भारतीय शेतकरी बळी पडत आहे.

४) आंतरराष्ट्रीय कंपन्यांचा दबाव वाढत आहे.

५) भारतातील सिमांत शेतकरी वर्गाचे मोठे नुकसान होत असून जमीनदार वर्ग निर्माण होण्याची भिती आहे.

## शिफारशी

१) कृषि माल आयातीवर नियंत्रण निर्माण करणे.

२) निर्यातीसाठी व इतर कारणासाठी शेतकऱ्यांना अनुदाने देण्यात यावी.

३) शेतीक्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वाढते वर्चस्वावर नियंत्रण ठेवणे.

४) कृषि संशोधनावर भर देणे.

५) उत्पादन खर्चावर आधारीत कृषि मालाला हमी भाव देण्यात यावा.

## सारांश

भारतामध्ये १९९१ला आर्थिक सुधारणेला जागतिकीकरणापासून सुरुवात झाली. याचा शेतकरी वर्गावर होणारा परिणामाचा अभ्यास करीत असतांना असे दिसून येते की, भारतासारख्या विकसनशील देशाच्या कृषिक्षेत्राला व पर्यायाने शेतकऱ्यांना जागतिकीकरणापासून होणाऱ्या लाभापेक्षा नुकसान जास्त होत असल्याचे दिसून येते. यातून शेतकरी हा आर्थिक संकटात सापडून आत्महत्या सारख्या पर्यायाकडे वळत असल्याचे दिसून येते.

## संदर्भ

१. प्रा. आर.पी.जाधव 'भारतीय जागतिक आर्थिक विकास', अथर्व प्रकाशन, पुणे, २०१०, पृ. क्र. १२०

E-ISSN : 2348-7143
February 2020

२. डॉ. बी.डी. इंगळे,'भारतीय अर्थव्यवस्था अरुणा प्रकाशन', लातूर, २०१६, पृ. क्र. १२६
३. प्रा. जगन कराडे 'जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने', डायमंड पब्लीकेशन्स, पुणे, २००८, पृ. क्र. ४६
४. डॉ. ढाले एस.यू. रिसर्च जर्नी, मार्च २०१९, पृ. क्र. ११२
५. www. Lokmat.com> राष्ट्रीय

इतरसंदर्भ ग्रंथ

१. दत्त सुंदरम –भारतीय अर्थव्यवस्था
२. दातार माधव –जागतिकीकरण आणि शेतीपेच प्रसंग (दिवाळी विशेषांक)
३. खुपसे, मार्तंड–शेतकऱ्यांच्या आत्महत्या : चिंता व चिंतन

PRINCIPAL
Shivaji College, HINGOLI